**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २९ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९८** **दिनांक : ३१/१२/२०२४**

**विभाग :** मोटार व्हेईकल विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** मोटार व्हेईकल विभागाकडील अग्रीम रकमेचे समायोजन करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेकडील वाहन दुरूस्ती,तसेच पोट निवडणूक २०२०-२०२१ करिता कामांसाठी कर्मचारी अग्रीम रक्कम घेण्यात येवून कामे करून घेण्यात आलेली आहेत.तथापी सदर रक्कमेचे समायोजन करणे बाकी आहे.या काळात कोरोना साथरोग आल्याने तसेच विभागाकडे एकच लिपीक असल्याने आगावू रकमेचे समायोजन करणेस विलंब झालेला आहे.

ज.ॲड.व्हा.नं.३२१४ दि.१०/०२/२०१७ अन्वये रू.८४०००/- वाहन दुरूस्ती

ज.ॲड.व्हॉ.नं.३३२७ दि.०३/०२/२०२० अन्वये रू.५०,०००/- पोट निवडणूक

ज.ॲड.व्हॉ.नं.३०९३ दि.२०/१२/२०२१ अन्वये रू.५०,०००/- पोट निवडणूक

उक्त आगावू रक्कम घेण्यात येवून सर्व कामकाज पूर्ण करण्यात आलेले आहे. त्याबाबचे बीले प्राप्त झाली असून प्रस्ताव मंजूर आहेत.तसेच जा.क्र.अर्थ विभाग ११३९ दि.२९/०२/२०२४ अन्वये आगावू रक्कमेचे समायोजन करणे बाबत पत्र प्राप्त झालेले आहे. विलंब झाल्याने मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. करिता महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता २०११ मधील नियम १६८ प्रमाणे मुदत बाह्य प्रस्ताव आगावू रक्कम समायोजन करणेस प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २९ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९९** **दिनांक : ३१/१२/२०२४**

**विभाग :** घनकचरा व्यवस्थापन विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत पाच / सात तारांकित मानांकन (५/७ स्टार रेटिंग) व वॉटर प्लस शहर जाहिर करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार शासन निर्णय क्र.स्वमअ-२०२२ /प्र.क्र.७३/नवि३४, १५ जुलै २०२२ नुसार मा.केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ भारत अभियान नागरी २.०" राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अभियानाचा मुख्य उद्देश कचरामुक्त शहर हा आहे.

"स्वच्छ भारत अभियान (ना)२.०" अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षण २०२४ ची अंमलबजावणी करित आहे. त्या अनुषंगाने अहिल्यानगर शहरास वॉटर प्लस व कचरामुक्त शहराचे स्टार रेटिंग जाहिर करणे आवश्यक आहे. वॉटर प्लस व कचरामुक्त शहराचे स्टार रेटिंग प्रोटोकॉल निश्चित करण्यत आले आहे. कचरामुक्त शहरांच्या स्टार रेटिंग प्रोटोकॉल मध्ये ३ स्टार, ५ स्टार व ७ स्टार रेटिंग बाबत पाहणी केंद्र शासना मार्फत करण्यात येणार आहे.

.स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत अहिल्यानगर शहर वॉटर प्लस व कचरामुक्त शहरांच्या पाच / सात तारांकित मानांकन (५/७ स्टार रेटिंग) कचरामुक्त शहर (गारबेज फ्री सिटी ) करिता केंद्र शासनाने तयार केलेल्या नियमावली मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दतीनुसार उपाय योजना करित आहे. अहिल्यानगर शहरातील घरोघरी कचरा संकलन करणे, घरोघरी कच-याचे वर्गीकरण करणे,कच-याची वाहतुक करणे व प्रक्रिया करणे याकरिता केलेली व्यवस्था, गटार, नाले व सार्वजनिक स्वच्छता, स्वच्छता ॲपचा वापर, प्लॅस्टिक बंदी कार्यवाही तसेच १५० टिपीडी चे खत निर्मिती प्रक्रिया प्रकल्प, ५० टिपीडी बांधकाम व पाडकाम कचरा प्रक्रिया प्रकल्प, ४ टिपीडी बायोमेडिकल कचरा प्रक्रिया प्रकल्प, सुक्या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी ७०टिपीडी एमआरएफ प्लॅटची व्यवस्था केलेली आहे.

वॉटर प्लस करिता केंद्र शासनाने तयार केलेल्या नियमावली, मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दतीनुसार उपाययोजना करित आहे. सांडपाणी,भुयारी गटारे यांची व्यवस्था आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता प्लँट उभारण्यात आले आहे. शहर पातळीवर सांडपाण्यावर प्रक्रिया करून किमान २५% पाण्याचा पुर्नवापर जसे बांधकाम,फलोउत्पादन,उदयान,रस्ते आणि सार्वजनिक व सामुदायिक शौचालय साफसफाई करिता वापर केला जातो.

सबब अहिल्यानगर शहर पाच / सात तारांकित मानांकन (५/७ स्टार रेटिंग) व वॉटर प्लस प्रमाणीकरण करिता शासनाने नमुद केलेले सर्व नियम पूर्ण करित आहे. त्यामुळे अहिल्यानगर शहर स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत पाच / सात तारांकित मानांकन (५/७ स्टार रेटिंग) कचरामुक्त शहर व वॉटर प्लस शहर म्हणून मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |